**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून ३ परमरुद्र संगणकांचं लोकार्पण
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून सियाचिनमधल्या लष्करी तळाची पाहणी
- MPSC कडून राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२३ ची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध
- सिंधुदुर्ग जिल्ह्यात राजकोटमध्ये शिवछत्रपतींच्या पुतळ्यासह शिवसृष्टी उभारणार

**आणि**

- देशातले शेअर बाजार उच्चांकी पातळीवर बंद

**<><><><><><>**

संशोधनातून स्वावलंबन हाच आजचा आपला मंत्र बनला आहे. विज्ञानाचं महत्त्व केवळ शोध आणि विकासातच नाही तर प्रत्येकाच्या आशा-आकांक्षांना पूर्ण करण्यासाठी आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. हवामान आणि वातावरण बदलासाठीची उच्च क्षमता कम्प्युटिंग यंत्रणा असलेल्या पुणे इथल्या तीन परम रुद्र सुपर कॉम्प्युटिंग प्रणाली तसंच, उच्च कार्यक्षमतेच्या संगणकीय प्रणालीचं उद्घाटन त्यांनी दूरदृश्य पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. भारत संगणकीय क्षेत्र तसंच विज्ञान-तंत्रज्ञानात स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे महत्त्वाचं पाऊल असून डिजिटल क्रांतीच्या

युगात संगणकीय क्षमता हा राष्ट्रीय क्षमतेचा पर्याय बनत असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय सुपरकॉम्प्युटिंग मिशन अंतर्गत सुमारे १३० कोटी रुपये किमतीचे आणि स्वदेशी बनावटीचे तीन परम रुद्र सुपर कॉम्प्युटर विकसित करण्यात आले आहेत. हे सुपर कॉम्प्युटर पुणे, दिल्ली आणि कोलकाता इथे संशोधनासाठी ठेवण्यात आले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू लडाखच्या दौऱ्यावर असून आज त्यांनी सियाचिन इथल्या लष्करी तळाची पहाणी केली. सियाचिन ग्लेशियर इथं तैनात असलेले जवान आणि अधिकाऱ्यांशी राष्ट्रपतींनी संवाद साधला. सियाचिन इथल्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहून देशाचं रक्षण करणाऱ्या जवानांच्या शौर्याचं त्यांनी कौतुक केलं. तसंच या सैनिकांच्या कुटुंबांचे ही राष्ट्रपतींनी आभार मानले. सियाचिन लष्करी तळावर असलेल्या युद्ध स्मारकावर राष्ट्रपतींनी पुष्पांजली अर्पण करत त्यांना आदरांजली वाहिली.

माजी राष्ट्रपती डॉक्टर अब्दुल कलाम, रामनाथ कोविंद यांच्यानंतर सियाचिनला जाणाऱ्या  द्रौपदी मुर्मू या तिसऱ्या राष्ट्रपती आहेत.

**<><><><><>**

संघटन शक्ती मजबूत करण्याची आणि डबल इंजिन सरकारची कामगिरी सामान्य माणसांपर्यंत पोहचवण्याची सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकत्याच केलेल्या महाराष्ट्र दौऱ्यात दिली आहे. या मूलमंत्राचे पालन करुन राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी प्रयत्न करू, असं भाजपा

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आज म्हणाले. मुंबईत ते वार्ताहरांना संबोधित करत होते. या दौऱ्यात अमित शहा यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळं संघटनेत ऊर्जा निर्माण झाली आहे. महायुतीच्या विजयासाठी पक्ष संघटना आता जोमानं काम करेल, असंही त्यांनी सांगितलं. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन सामान्य जनतेच्या मनात महाविकास आघाडीने खोट्या प्रचारामुळे निर्माण केलेला संभ्रम दूर करतील, त्याचबरोबर केंद्र, राज्य सरकारच्या कामगिरीची माहिती देतील, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेनं ‘महाविजय संवाद’ या राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा आज केली. शिवसेनेच्या युवा सेना, महिला आघाडी आणि शिवसेना सोशल मीडिया या तीन विभागांकडून उद्यापासून राज्यभरात हे अभियान राबवलं जाणार आहे. यात प्रत्येक विधानसभा मतदार संघाचा आढावा घेऊन पक्ष संघटना मजबूत केली जाईल, अशी माहिती शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली.

गेल्या दोन अडीच वर्षात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकारनं केलेली कामं प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. त्यासाठी या अभियानाअंतर्गत दररोज एक नेता आणि उपनेता एका विधानसभा मतदार संघाला भेट देईल. तिथल्या पाच ठिकाणी जाऊन गाठीभेटी, मेळावे घेतले जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना शिवडी दंडाधिकारी न्यायालयानं आज १५ दिवसांची कोठडी आणि २५ हजारांचा दंड ठोठावला. मीरा भाईंदर शहरातल्या शौचालय कंत्राटावर केलेल्या विधानामुळे मेधा सोमय्या यांनी त्यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता.

<><><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२३ ची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. वैद्यकीय अहवाल विचारात घेऊन उमेदवारांना पदांचे पसंतीक्रम ऑनलाईन सादर करण्याची सुविधा लवकरच उपलब्ध करुन दिली जाईल, असं आयोगानं कळवलं आहे. ही यादी विविध न्यायालयांमधे दाखल असलेल्या प्रकरणांवरच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून जाहीर केली असल्याचं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><><>

देशातल्या शेअर बाजारांनी आजही विक्रमी पातळी गाठली. सेन्सेक्स सत्रादरम्यान ८६ हजारांच्या उंबरठ्यावर जाऊन आला. दिवसअखेर सेन्सेक्स ६६६ अंकांनी वधारून ८५ हजार ८३६ अंकांवर तर निफ्टी २१२ अंकांची वाढ नोंदवून २६ हजार २१६ अंकांवर बंद झाला. चीनने दिलेलं आर्थिक प्रोत्साहन पॅकेज, आशियाई निर्देशांकातली तेजी याचा परिणाम शेअर बाजारात झाला.

<><><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण-राजकोट इथं शिवछत्रपतींच्या पुतळ्यासह शिवसृष्टी उभारणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आज दिली. ओरोस इथं ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

राजकोट इथं शिव छत्रपतींचा पूर्णाकृती ब्रॉन्झचा पुतळा उभारणार येणार असल्याचं केसरकर यांनी सांगितलं. पुतळ्याच्या बाजूला असलेल्या आरक्षित जागेवर शिवसृष्टी उभारण्यात येणार असून या दोन्हीसाठी एकूण १०० कोटी खर्च प्रस्तावित असल्याचं केसरकर यांनी सांगितलं. पुतळा सहा महिन्यात तर शिवसृष्टीच काम एका वर्षात पूर्ण होईल असंही त्यांनी यावेळी सांगितलं. यावेळी प्रकल्पाचं सादरीकरण करण्यात आलं.

**<><><><><><>**

रत्नागिरी शहर स्मार्ट सिटी म्हणून विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानं ४०० कोटी रुपये मंजूर केल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी आज दिली. रत्नागिरीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

जिल्ह्यातल्या वाटद, राजापूर, मंडणगड इथं एमआयडीसीसह आणखीही काही प्रकल्प उभारले जाणार आहेत.

**<><><><><><>**

स्वच्छता पंधरवड्यानिमित्त अहमदनगर महानगरपालिकेनं शहरात आज स्वच्छता मोहीम राबवली. या मोहिमेत विद्यार्थी तसंच पालिकेचे कर्मचारी सहभागी झाले होते. शहरातल्या तुंबलेल्या गटारांमधून शेकडो टन कचरा

काढून स्वच्छता करण्यात आली. यावेळी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. याविषयी आयुक्त यशवंत दांडगे यांनी सांगितलं…

**होल्ड - बाइट (१६ सेकंद)**

धाराशिव जिल्ह्यातही सांजा गावात जिल्हा परिषदेच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. या स्वच्छता मोहिमेत ग्रामस्थ तसेच शाळेतील सर्व शिक्षक, ग्रामपंचायतीचे सदस्य, स्वच्छता कर्मचारी सहभागी झाले होते. या निमित्तानं शाळेच्या परिसरात एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबवत वृक्षारोपण करण्यात आलं.

**<><><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९९ टक्क्यावर पोहोचला असून धरणाच्या १८ दरवाजांमधून सध्या ३७ हजार ७२८ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यातल्या इसापूर तर बीड जिल्ह्यातल्या मांजरा धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरु आहे. लातूर जिल्ह्यातल्या तेरणा, मांजरा आणि रेणा या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. यापैकी रेणापूर मध्यम प्रकल्पातून रेणा नदीपात्रात विसर्ग सुरू असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नांदेडमध्ये विष्णुपुरी प्रकल्पाचे दोन दरवाजे उघडले असून त्यातून २९ हजार ८०५ क्युसेक्स वेगाने गोदावरी नदीपात्रात विसर्ग सुरू आहे.

सातारा जिल्ह्यातल्या कण्हेर आणि उरमोडी धरणातून आज सकाळपासून विसर्ग करण्यात येत आहे. धुळे जिल्ह्यातही अनेक धरणांमधून पाणी सोडण्यात येत आहे.

<><><><><><>

हवामान विभागानं उद्या सकाळी साडे ८ वाजेपर्यंत पालघर आणि नाशिकमध्ये रेड अलर्ट दिला आहे. या दोन्ही जिल्ह्यात वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र आणि ठाणे, रायगड तसंच पुण्यात ऑरेंज अलर्ट आहे. राज्याच्या इतर भागातही आज जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><><>//